-: प्रेसनोट दिनांक- २०/१०/२०२१ :-

**राजेंद्र शंकर उगलमुगले, सहा. फौजदार, नेम. कुरूंदवाड पोलीस ठाणे, कोल्हापूर, वर्ग - ३ रा. विकास कॉलनी, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी लाचेची मागणी करून ती लाच रक्कम खाजगी इसम आप्पासाहेब सुभाष मगदूम, वय ४०, रा. कुरूंदवाडा, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर याचे मार्फत स्विकारलेबाबत.........**

---

यातील तकारदार यांचे भावाविरूध्द अवैध गुटका वाहतुकी करीत असल्याबाबत कारवाई करून कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयातील आरोपी तकारदार यांचे भावा चे जामीनासाठी व गुन्हयाचे तपासात मदत करण्यासाठी सदर गुन्हयाचे तपासी अमंलदार उगलमुगले हे ५०,०००/- रू. लाचेची मागणी करत असलेबाबत तकारदार यांची ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर विभागास तकार प्राप्त झाली.

तकारीप्रमाणे सापळा कारवाई आयोजीत केली असता, आज दिनांक २०/१०/२०२१ रोजी कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष आरोपी लोकसेवक सफौ. उगलमुगले यांनी तकारदार यांचेकडे त्यांचे भावाविरूध्द दाखल गुन्हयाचे तपासामध्ये मदत करणेसाठी त्यांचेकडे तडजोडीअंती ४०,०००/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम खाजगी इमस आप्पासाहेब मगदूम यांचेकरवी स्विकारल्याने त्या दोघांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत आरोपी लोकसेवक राजेंद्र शंकर उगलमुगले, सहा. फौजदार, नेम. कुरूंदवाड पोलीस ठाणे, कोल्हापूर, वर्ग - ३ रा. विकास कॉलनी, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर व खाजगी इसम आप्पासाहेब सुभाष मगदूम, वय ४०, रा. कुरूंदवाडा, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द कुरूंदवाड पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री सुहास नाडगोडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ शरद पोरे, पोना सुनिल घोसाळकर, पोना नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.**

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,**
**४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४**

Scanned by TapScanner